MHAU050003212026

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३४/२०२६.**

**गायत्री कृष्णा भालेकर व इतर**

**वि.**

**निरंक.**

## निशाणी क्रमांक १ खालील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार क्र. १ ते ३ यांनी वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. अर्जदार क्र. १ ते ३ यांचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ यांचे वडील व अर्जदार क्र. ३ यांचा मुलगा नामे कृष्णा बाळु भालेकर हे दिनांक १७.०६.२०२५ रोजी मयत झाले आहे. अर्जदार क्र. १ ते ३ हे मयत कृष्णा बाळु भालेकर यांचे एकमेव कायदेशीर वारस आहेत. मयत कृष्णा बाळु भालेकर यांना अर्जदार यांचे व्यतिरीक्त इतर कोणीही वारस नाहीत. अर्जदार हे तहसिल कार्यालय, वैजापूर येथे वारस प्रमाणपत्र काढण्याकरीता गेले असता त्यांना मा. दिवाणी न्यायाधीश साहेब, वैजापूर येथून वारस प्रमाणपत्र आणावे असे सांगण्यात आले. त्यामुळे अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामकाजाकरीता वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यक व गरजेचे झालेले आहे; म्हणून सदरचा अर्ज अर्जदार यांनी मयत कृष्णा बाळु भालेकर यांचे कायदेशीर वारस असल्याचे ठरवून मिळण्याकरीता दाखल केला आहे.

३. अर्जदारांनी अर्ज दाखल केल्यानंतर अर्जाची जाहीर सुचना व जाहीर प्रकटन दिल्याप्रमाणे दैनिक ''मराठवाडा केसरी'' या वृत्तपत्रात दि. १०.०२.२०२६ रोजी प्रकाशित करण्यात आले व अर्जाबद्दल काही आक्षेप असल्यास न्यायालयास

कळविण्यास सांगितले, परंतू अद्याप न्यायालयास कोणताही आक्षेप प्राप्त झाला नाही.

४. अर्जदारांतर्फे विधिज्ञ श्री. आर. एच. शिंदे यांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

५. प्रस्तुत अर्जाचे निर्णयाकामी खालील मुद्दे अर्जाच्या निकाल निश्चिती करीता उपस्थित झाले. त्यांचेवरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार क्र.१ ते ३ हे मयत कृष्णा बाळु भालेकर यांचे कायदेशीर वारस असून वारसाचा दाखला मिळण्यास पात्र आहेत काय ? | होकारार्थी. |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ करीताः–**

६. अर्जदारांतर्फे अर्जदार क्र.१. गायत्री कृष्णा भालेकर यांनी स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र दाखल करुन कथन केले की, अर्जदार हे मयत कृष्णा बाळु भालेकर यांचे कायदेशीर वारस आहेत. सदर अर्जासोबत अर्जदारांनी मौजे साकेगाव, ता. वैजापूर येथील गट क्र. १५२ व १५६ च्या सातबारा उता–याची सत्य प्रतीची स्कॅन प्रत, मयत कृष्णा बाळु भालेकर यांचे मृत्यु प्रमाणपत्राच्या सत्य प्रतीची स्कॅन प्रत व अर्जदार क्र. १ व २ यांचे छायांकित आधार ओळखपत्रांच्या स्कॅन प्रती दाखल केलेल्या आहेत. तद्नंतर अर्जदारांनी पुरसीस दाखल करून त्यांचा पुरावा बंद केला आहे.

७. अर्जदारांनी दाखल केलेल्या प्रस्तुतच्या अर्जास कोणीही हरकत घेतलेली

नाही. अर्जदारांतर्फे दाखल करण्यात आलेला लेखी पुरावा हा तोंडी पुराव्यास पुरक असून अबाधित आहे. अर्जदारांनी दाखल केलेला अर्ज व जाहीर प्रकटन दाखल केल्यानंतर कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही. अर्जदारांतर्फे अर्जदार क्र.१ यांनी दाखल केलेल्या पुराव्याच्या शपथपत्रामध्ये अर्जदार हे मयत कृष्णा बाळु भालेकर यांचे वारस असून त्यांना इतर कोणीही वारस नसल्याचे कथन केले आहे. वरील कथने विचारात घेता मयत कृष्णा बाळु भालेकर यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस असल्याचे स्पष्ट होते.

८. अर्जदारानी अभिलेखावरती दाखल केलेल्या उपरोक्त पुराव्याबाबत शंका घेण्याची परिस्थिती दिसून येत नाही. तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता मयत कृष्णा बाळु भालेकर यांचे अर्जदार हे कायदेशीर वारस असल्याचा निष्कर्ष काढण्यास कोणतीही हरकत नाही. सबब, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.२ करीताः</u>–**

९. मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदविल्याने अर्जदार क्र. १ ते ३ हे मयत कृष्णा बाळु भालेकर यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र मिळणेस पात्र ठरलेले आहे. परिणामतः अर्जदारांचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. करीता मुद्दा क्र.२ चे उत्तराकरीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार क्र.१. गायत्री कृष्णा भालेकर, अर्जदार क्र.२. स्नेहल

कृष्णा भालेकर व अर्जदार क्र.३. मथुरा बाळु भालेकर हेच मयत कृष्णा बाळु भालेकर यांचे कायदेशीर वारस असल्याचे जाहीर करण्यात येत आहे.

३. वारस प्रमाणपत्र निर्गमित करण्याकरीता अर्जदार यांनी नियमाप्रमाणे योग्य ते न्यायालयीन शुल्क न्यायालयात जमा करावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SHAZIYA KHAN
Date: 2026.04.08 13:00:26 +0530

दिनांकः ०८.०४.२०२६ (**श्रीमती एस. के. खान**)

वैजापूर. २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, वैजापूर.